महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गडचिरोली
Government Medical College Gadchiroli
Mul Road, Complex - 442605, Maharashtra, (INDIA)
Email –gmcgadchiroli@gmail.com

जा.क्र.शावैमगड/ आस्थापना 1 ते 3 / जाहीरात अध्यापक /3220 /२०२६ दि :०2 / ०९/२०२६

प्रति,
मा. आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

**विषय :- तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांकरीता करारतत्वावर प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक ही रिक्त पदे भरण्याकरीता जाहीरात आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बाबत.**

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक पदनि /२०२३/प्र.क्र १७६/२३/वैसेवा-२/दि ०६.०३.२०२४

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार, १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवनिर्मीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गडचिरोली येथे सुरु करण्यात आलेले असुन आवश्यक असलेली पदे मंजुर करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सन २०२६-२७ या वर्षात पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठी (MBBS) १०० विद्यार्थ्यांना प्रवेशीत असल्याने भारतीय आयुर्विज्ञान परीषदेचे निरीक्षण पथकानीं या संस्थेची पाहणी केलेली आहे. त्यानुसार प्रवेशित (पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठी) (MBBS) विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित तसेच संस्थेचे हित लक्षात घेता या महाविद्यालयात प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक ही रिक्त असलेली पदे भारतीय आयुर्विज्ञान परीषदेच्या मानकानुसार भरण्याकरीता या कार्याकडुन जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीमध्ये दर्शविल्याप्रमाणे रिक्त पदांकरीता मुलाखत (Walk in Interview) **दर महिण्यातील दर बुधवारी तीन महीण्यापर्यत घेण्यात येईल.**

त्यानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गडचिरोली येथील रिक्त असलेली **प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक,** ही पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरीता वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात आपल्या www. Med-edu.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, हि विनंती.

करीता आपल्या माहिती व योग्य कार्यवाहीस्तव सविनय सादर.

सहपत्र : सोबत जाहिरात जोडली आहे.

आपला विश्वासू

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गडचिरोली

**प्रत माहितीस्तव सविनय सादर. - मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गडचिरोली
Government Medical College Gadchiroli
Mul Road, Complex - 442605, Maharashtra, (INDIA)
Email –gmcgadchiroli@gmail.com

जा.क्र.शावैमगड/ जाहीरात अध्यापक / 3220 /२०२६ दि :02/ ०१/२०२६

# जाहिरात

**विषय :- प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे ३६४ दिवसाकरीता तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर भरणे बाबत.**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. पदनि-२०२३/प्र.क्र.१७६/२३ वैसेवा - २ दिनांक ०६ मार्च, २०२४.
२. Govt. Resolution No. DSB १२०१ /P.K.२७६/२००१ /Med serv-३, Mumbai, Dt.१०/०८/२००१.
३. Govt. Resolutin No. Pay- २०१९/P.K.०३/२०१९/Med-२, Mumbai Date ३१/१२/२०२०.
४. The Gazette of India, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग अधिसूचना दि.१६.०८.२०२३.

उपरोक्त विषयानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गडचिरोली या संस्थेतील खालील नमुद विषयातील **३६४ दिवसांकरीता करारतत्वावर प्राध्यापक, (मानधन - २,००,०००/-) सहयोगी प्राध्यापक, (मानधन - १,८५,०००/-) सहाय्यक प्राध्यापक (मानधन - १,१०,०००/-)** या संवर्गातील पदे शासनातर्फे विहीत मार्गाने भरेपर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उपलब्ध होईपर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रचलीत शासन नियमानुसार एकत्रित मानधनावर भरण्याकरीता वरील संदर्भान्वये संस्थेच्या जाहिरात फलकावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. **महिण्याच्या प्रत्येक बुधवारी (जाहीरातीच्या दिनांकापासुन ) तीन माहिण्यापर्यत घेण्यात येत** असुन मुलाखतीस पात्र उमेदवारांनी अर्ज व आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह थेट मुलाखतीकरीता स्वखर्चाने उपस्थित राहावे.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
गडचिरोली

महाराष्ट्र शासन
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गडचिरोली
(अधिष्ठाता यांचे कार्यालय)
# GOVERNMENT MEDICAL COLLEGE, GADCHIROLI
Mul Road, Complex - 442605, Maharashtra, (INDIA)
Email – gmcgadchiroli@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.शावैमग/जाहिरात अध्यापक/ 3220 /२०२६ दिनांक :02/०९/२०२६

## ADVERTISEMENT

## WALK IN INTERVIEW

Walk in interview were held on dated **16/09/2026 at 01.00 PM** and **Wednesday of every Week thereafter till the all posts** are filled for the post of Professor, Associate Professor, Assistant Professor (For 364 Days) at Government Medical College, Gadchiroli. These posts are purely temporary and contractual basis for 364/120 days or till Regular/Bonded candidates From MPSC/DPC will be available whichever is earlier. Detail advertisement is published on notice board of Government Medical College, Gadchiroli and on website www.med-edu.in & www.gmcgadchiroli.org Interested candidates should remain present in Dean's office Gadchiroli On Working Day with all original documents.

(Candidates eligible for Professor and Associate Professor Post order will be issued from DMER, Mumbai after Scrutiny at GMC, Gadchiroli)

Dean,
Govt.Medical College,
Gadchiroli

## Government Medical College, Gadchiroli
## (Statement showing vacancy position)

| Sr.No. | Department | Designation | Vacant | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1 | **Anatomy** | Professor | 1 | As per prevailing NMC norms |
| | | Asst. Prof. | 1 | |
| | | | | |
| 2 | **Physiology** | Professor | 1 | |
| | | Associate Prof. | 1 | |
| | | Asst. Prof. | 2 | |
| | | | | |
| 3 | **Biochemistry** | Asst. Prof. | 1 | |
| | | | | |
| 4 | **Pharmacology** | Professor | 0 | |
| | | Associate Prof. | 1 | |
| | | Asst. Prof. | 2 | |
| | | | | |
| 5 | **Pathology** | Professor | 1 | |
| | | Associate Prof. | 0 | |
| | | Asst. Prof. | 0 | |
| | | | | |
| 6 | **Microbiology** | Professor | 0 | |
| | | Asst. Prof. | 0 | |
| | | | | |
| 7 | **FMT** | Professor | 1 | |
| | | | | |
| 8 | **PSM** | Professor | 1 | |
| | | Associate Prof. | 0 | |
| | | Asst. Prof. | 1 | |
| | | | | |
| 9 | **Medicine** | Professor | 1 | |
| | | Associate Prof. | 0 | |
| | | Asst. Prof. | 1 | |
| | | | | |
| 10 | **Pediatrics** | Professor | 1 | |
| | | Associate Prof. | 1 | |
| | | Asst. Prof. | 0 | |
| | | | | |
| 11 | **Dermatology** | Professor | 1 | |
| | | Associate Prof. | 0 | |
| | | Asst. Prof. | 0 | |
| | | | | |
| 12 | **Psychiatry** | Professor | 1 | |
| | | Associate Prof. | 1 | |
| | | Asst. Prof. | 1 | |
| | | | | |
| 13 | **Surgery** | Professor | 1 | |
| | | Associate Prof. | 0 | |
| | | Asst. Prof. | 1 | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| 14 | **Orthopedic** | Professor | 1 |
| | | Associate Prof. | 0 |
| | | Asst. Prof. | 0 |
| | | | |
| 15 | **ENT** | Professor | 1 |
| | | Associate Prof. | 1 |
| | | Asst. Prof. | 0 |
| | | | |
| 16 | **Ophthalmology** | Professor | 0 |
| | | Associate Prof. | 1 |
| | | Asst. Prof. | 0 |
| | | | |
| 17 | **OBGY** | Professor | 1 |
| | | Associate Prof. | 1 |
| | | Asst. Prof. | 0 |
| | | | |
| 18 | **Anesthesiology** | Professor | 1 |
| | | Associate Prof. | 0 |
| | | Asst. Prof. | 2 |
| | | | |
| 19 | **Radiology** | Professor | 0 |
| | | Associate Prof. | 1 |
| | | Asst. Prof. | 0 |
| | | | |
| 20 | **Dentistry** | Professor | 0 |
| | | Associate Prof. | 0 |
| | | Asst. Prof. | 1 |

Dean
Govt. Medical College, Gadchiroli

**(Annexure-A)**

| Sr.No. | Topics | Marks |
|---|---|---|
| 1 | **Qualification**<br>1. MS/MD/DNB- 10 marks.<br>2. MBBS (Aggregate marks of all years)<br>65% to 70% and above -20 marks<br>60% to 65% -15 marks<br>55% to 60% -10 marks<br>50% to 55% -05 marks<br>3. XII th (Aggregate marks)<br>70% to 80% and above -20 marks<br>60% to 70% -15 marks<br>50% to 60% -10 marks<br>40% to 50% -05 marks | 50 |
| 2 | 2. Additional Qualification in concerned subject (DNB/CPS/Phd/Fellowship) | 5 |
| 3 | 3. Teaching experience in concerned speciality(mandatory) **For Professor 3 years teaching experience as Associate professor-10 marks & 1 Mark each for additional year as Associate Professor.<br>**ForAssociate Prof. 4 years teaching experience as Assistant Prof-10 marks<br>& 1 mark each for additional year as Assistant Professor. | 20 |
| 4 | Research paper publications (mandatory)<br>**For Professor 4 Research publications (Atleast 2 as Associate professor)-5 marks & 1 mark each for additional publication. **For Associate Prof. 2 Research publications -05 marks. & 1 mark each for additional publication | 10 |
| 5 | Interview | 15 |
| | **Total** | **100** |

**Note :**

1. Candidate must upload all relevant documents as proof.
2. Provisional merit list to call candidates for Interview will be prepared as per marks obtained in serial no.1 to 4 (Total marks obtained out of 85 marks)
3. All appointments shall be done as per NMC rules. (for rules please refer Gazette Notification - Teachers Eligilibity Qualifications in Medical Institutions regulations,2022 dt.14.02.2022) as amended from time to time.

## अर्ज मिळण्याचे ठिकाण :-

१) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गड़चिरोली जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, कॉम्प्लेक्स, मुल रोड, गडचिरोली. पिन कोड ४४२५०६

२) मुलाखत दिनांक :

१. **मुलाखत दर महिण्याच्या दर बुधवारी सकाळी ०१.०० वाजता** मा अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, गडचिरोली यांच्या दालनात घेण्यात येईल

२. मुलाखतीसाठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठविले जाणार नाही.

३. मुलाखतीच्या वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

४. मुलाखतीस स्वखर्चाने हजर राहावे लागेल त्याकरीता कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहाणार नाही.

३) महत्वाची टिप :

१. उमेदवार हा भारतीय नागरीक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२. उमेदवाराची वय नियुक्तीच्या वेळेस कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करारा पदधतीने नियुक्तीसाठी त्या त्या पदावरुन सेवानिवृत झालेल्या अध्यपकाबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेने विहित किलेली आवश्यक आहर्ता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील (बिगर सेवा निवृत्ती) उमेदवार पात्र असतील.

४) गुणांकन पद्धत

जाहिरातीसोबत जोडेलेल्या परिशिष्ठ अ मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.

१. परिशिष्ठ अ मध्ये नमुद केल्यानुसार अनुक्रमांक ०१ ते ०४ वरिल एकुण ८५ गुणाच्या अधारे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवारांना प्रत्येक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

२. प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीअंती १०० गुणांपैकी किमाण ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणा-या उमेदवारांचा करार तत्वावरील नियुक्ती करीता विचार केला जाईल.

५) नियम व अटी :

१. करार पदधतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसाचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील तथापि सदरहू पदावर नियमित पदावर उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवारांच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार मा. आयुक्त (वै.शि.) यांना राहतील.

२. उमेदवाराचे कामकाज समाधान कारक नसल्यास अथवा गंभिरस्वरुपाची अनियमीतता व गैरवर्तणुक या कारणासाठी त्यांची नियुक्ती पुर्वसुचना शिवाय संपुष्टात आणण्यात येईल.

३. करार पदधतीने नियुक्त उमेदवारांने प्रचलित मानकानुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमुन दिलेली विवक्षीत कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४. वरिल प्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविदयालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबादा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पदधतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहाणार नाही तसेच सदर कालावधी इतर कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

६. करार पदधतीने नियुक्त उमेदवारांस त्यांच्या सेवा कालावधीत केवळ नैमत्तिक रजा अनुज्ञेय असतील.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे किंवा माहिती आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाही.

९. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यत त्यास कोणत्याही परिस्थित सेवा सोडता येणार नाही. तशा अशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे

शपथपत्र सादर करणा-या उमेदवारास करारपदधीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालु असलेल्या कालावधीत विद्यार्थीहित विचारात घेता उमेदवारांचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाही.

१०. बिगरसेवा निवृत गटातुन करारपदधतीने निवृत होणा-या अध्यपकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पुर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाही.

११. अर्जदाराने संबधित पदासाठी शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे वैद्वकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदर जाहिरातीमधील नमुद पदसंख्येत बदल करणे किंवा सदरची जाहिरात पुर्णतः रदद करण्याचा अधिकार मा. आयुक्त्. वै.शि.व आयुष / अधिष्ठाता यांनी स्वतः कडे राखुन ठेवला आहे.

१३. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यांना निवड प्रकियेतून बाद करण्यात येईल.

१४. अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१५. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थिती राहावे लागेल (मुलाखतीचे वेळ व तारिख पात्र उमेदवाराना स्वतंत्र रित्या कळविण्यात येईल)

१६. मुलाखतीला येतांना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवांजाचे मुळ कागदपत्र सोबत आणणे बंधन कारक राहील.

६) **शैक्षणिक पात्रता :**

१. महाराष्ट्र वैद्यक परिषद व राष्ट्रिय आयुर्विज्ञान आयोग नवी दिल्ली यांच्या मानकांनुसार अर्हता प्राप्त.

२. महाराष्ट्र वैद्यक परिषद यांच्याकडील वैधता प्राप्त नोंदणी (Valid MMC Registration / Renewal) असणे आवश्यक आहे.

७) **टिप :**

सदर जाहिरातीमधील नमुद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णतः रदद करण्याचा अधिकार मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग / अधिष्ठाता यांनी स्वतःकडे राखुन ठेवला आहे.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
गडचिरोली

प्रति :-

१. कार्यालयीन संकेतस्थळ, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
२. सुचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गडचिरोली
३. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचे संकेतस्थळ.

प्रत :- माहितीस्तव

१. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग, मुंबई.
२. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
३. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय महाराष्ट राज्य यांना सुचना फलकावर लावण्याकरिता सस्नेह सादर.